रयत शिक्षण संस्थेचे,

# सी.डी.जैन कॉलेज ऑफ कॉमर्स, श्रीरामपूर

## राष्ट्रीय सेवा योजना

## विशेष श्रम संस्कार शिबीर अहवाल

## शिबीर स्थळ मोजे - वडाळा महादेव ता.श्रीरामपूर

## कालावधी - २६ नोव्हेंबर २०१७ ते ०२ डिसेबंर २०१७

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ पुणे आणि सी.डी.जैन कॉलेज ऑफ कॉमर्स,श्रीरामपूर यांचे संयुक्त विद्यमाने मोजे वडाळा महादेव ता.श्रीरामपूर येथे राष्ट्रीय सेवा योजनेचे विशेष श्रमसंस्कार शिबीर २६ नोव्हेंबर २०१७ ते ०२ डिसेबंर २०१७ या कालावधीत संपन्न झाले."स्वच्छ व स्वस्थ भारत अभियान"ही या विशेष श्रमसंस्कार शिबीराची मध्यवर्ती कल्पना होती.

दि २५ नोव्हेबंर २०१७ रोजी साय.०४.०० वाजता मा.सरपंच ग्रामपंचायत सदस्य व निवडक ग्रामस्था समवेत शिबीर काळात राबविल्या जाणा-या उपक्रमाबाबत सविस्तर चर्चा केली.ग्रामस्थांचा सहभाग वाढविण्यासाठी गावाच्या विकासाशी निगडीत उपक्रमांची उपयुक्तता स्पष्ट केली.

शिबीराचे यशस्वी नियोजन करण्यासाठी स्वयंसेवकाची स्वतंत्र बैठक घेवून कामकाज वाटपासाठी १० स्वतंत्र गट पाडले.प्रत्येक दिवसाच्या संपुर्ण कामकाजाची जबाबदारी गटावर सोपविली.शिबीरार्थी स्वयंसेवकासमवेत शिबीरातील दिनचर्या,शिस्त,वेळेचे नियोजन,विविध उपक्रमातील सहभागाबाबत सविस्तर चर्चा केली.

### उद्घाटन समारंभ

दि २७ नोव्हेंबर २०१७ रोजी सकाळी ०९.०० वाजता प्रमुख पाहुणे मा.श्री.सुभाष दळवी तहसिलदार श्रीरामपूर व अध्यक्षा मा.सौ.मीनाताई जगधने,मॅनेजिंग कौन्सिल सदस्या,र.शि.स.सातारा,चेअरमन रयत शैक्षणिक संकुल,श्रीरामपूर,उद्घाटक मा.सौ.प्रमिलाताई राठोड सरपंच वडाळा महादेव,मा.प्रकाश निकम पाटील,सदस्य,जनरल बॉडी.र.शि.स.सातारा,महाविद्यालयाचे मा.प्राचार्य डॉ.एल.डी.भोर, मा.प्राचार्य डॉ. के.एच.शिंदे रा.ब.ना बोरावके महाविद्यालय,श्रीरामपूर,मा.प्राचार्य डॉ.एम.एस.पोंधे स्वामी सहजानंद भारती शिक्षणशास्त्र महाविद्यालय,श्रीरामपूर, उपसरपंच मा.श्री.सुनिल कुदळे,ग्रामपंचायत सदस्य,अर्चना गायकवाड,मोहिनी जेठे,आप्पासाहेब वाघ,सचिन पवार,ताराबाई राऊत,वर्षा झिंज व इतर ग्रामस्थांच्या उपस्थितीत शिबीराचे उद्घाटन समारंभ संपन्न झाले.

महाविद्यालयाचे प्राचार्य.डॉ.एल.डी.भोर यांनी पाहुण्यांचा परिचय करुन देवून सर्व मान्यवरांचा साध्या पध्दतीने सत्कार केला.कार्यक्रम अधिकारी प्रा.सादिक सय्यद यांनी शिबीरकाळात राबविल्या जाणा-या विविध उपक्रम व दैनदिन कार्यक्रम,विविध विषयावरील व्याख्याना बाबत माहिती दिली.शिबीर काळात राबविल्या जाण-या सर्व उपक्रमात ग्रामस्थांनी सहभाग घ्यावा असे अहवान केले.

उद्घाटन समारंभाचे प्रमुख पाहुणे मा.श्री. सुभाष दळवी यांनी स्वच्छ व स्वस्थ भारत अभियानात रासेयो स्वयंसेवकांच्या भूमिकेबाबत मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षा मा.सौ.मीनाताई जगधने यांनी शिबीरातील सर्व उपक्रमामध्ये ग्रामस्थांनी सक्रीय सहभाग घेवुन आपले गाव स्वच्छ व रोगराई मुक्त करावे असे प्रतिपादन केले. तर उद्घाटक मा.सौ.प्रमिलाताई राठोड यांनी स्वच्छता हा प्रत्येक नागरिकाच्या

जीवनाचा अविभाज्य अंग आहे त्यामुळे वैयक्तिक व सार्वजनिक स्वच्छतेचा अंगीकार प्रत्येक नागरीकाने करावा असे अवाहन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कार्यक्रम अधिकारी प्रा.सौ.डॉ.गुजर पी.एस. यांनी केले. तर अभार प्रा.डॉ.तुपे बी.जी. यांनी मानले. या विशेष श्रमसंस्कार शिबीरात रा.से.योचे १२५ स्वयंसेवक सहभागी झाले यामध्ये ४० विद्यार्थी व ८५ विद्यार्थिनींचा सहभाग होता.

## विशेष उपक्रम

शिबिराच्या पहिल्या दिवशी स्वच्छ व स्वस्थ भारत अभियानाचा आराखडा तयार करण्यासाठी सर्व स्वयंसेवकांना गावातील विविध सोयी व सुविधांची माहिती दिली. गावातील सर्व अंगणवाड्या, प्राथमिक शाळा, माध्यमिक विद्यालये, ग्रामपंचायत कार्यालय विविध कार्यकारी सेवा सोसायटी, प्राथमिक आरोग्य केंद्र पाणीपुरवठा करणारी जलकेंद्र याबाबत माहिती करुन या सुविधामध्ये सुधारणा करण्यासाठी केल्या जाणाऱ्या उपाययोजनेबाबत ग्रामस्थांशी चर्चा केली. स्वच्छत: राखण्यासाठी शौचालयाचा वापर करण्याबाबत गावात जनजागृती केली.

शिबिराच्या दुसऱ्या दिवशी ग्रामपंचायत कार्यालय व प्राथमिक शाळा परिसरात स्वच्छता मोहिम राबविण्यात आली अनेक वर्षापासून वृक्षारोपन केलेल्या झाडांना आळी करुन पाणी दिले वृक्षतोड करु नये म्हणून स्वयंसेवकांनी घरो-घरी भेटी देवून गावात जनजागृती केली. नवीन वृक्षारोपनासाठी खडड् घेवून वृक्षारोपन केले. यादिवशी दुपारच्या सत्रात मा.डॉ.दिलीप पडघन (एम.डी. मेडीसीन) यांनी 'आहार आणि आरोग्य' या विषयावर बहुमोल मार्गदर्शन केले. संतुलित आहार मानवाचे आरोग्य निरोगी व सदृढ ठेवतो असे ते म्हणाले दु. ३ ते ४ या वेळेत श्री.सुखदेव फुलारी यांनी "विहिर पुनर्भरण प्रकल्प व पाणी बचत" या विषयी उद्बोधन केले. जलसंवर्धन काळाची गरज आहे पाणी म्हणजे जीवन आहे त्यासाठी त्याची बचत, काटकसर करणे गरजेचे आहे.

शिबिराच्या तिसऱ्या दिवशी सकाळी गावातील अंतर्गत रस्त्यांची स्वच्छता केली जिल्हा परिषद शाळे समोरील पटांगनातील गवत काढण्यात आले. शाळेतील विद्यार्थ्यांना स्वच्छतेचे महत्व सांगण्यात आले. या दिवशी दुपारच्या सत्रात मा.डॉ.वसंतराव जमधाडे वैद्यकीय अधिक्षक ग्रामीण रुग्णालय यांचे नेत्र तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये गावातील ज्येष्ठ नागरिकांच्या डोळ्यांची तपासणी करण्यात आली. डोळ्यांच्या आरोग्याची निगा कशी ठेवावी याचे प्रात्यक्षिकासह मार्गदर्शन केले. मा.नवाज शेख यांनी आयुष्यावर बोलू काही या विषयावर मार्गदर्शन केले. याप्रसंगी ते म्हणाले की जीवन म्हणजे निसर्गाची अनमोल भेट आहे. प्रत्येकानी आपल्या जीवनाचा निखळ आस्वाद घेतला पाहिजे असे मत व्यक्त केले.

शिबिराच्या चौथ्या दिवशी सकाळी गावातील महादेव मंदिर परिसरातील गवत काढण्यात आले. महादेव मंदिर परिसरातील वृक्षांना आळे करण्यात आले तसेच गावातील कुटुंबाचे सर्वेक्षण करण्यात आले यादिवशी दुपारच्या सत्रात "महिलांचे आरोग्य व आहार" या विषयावर प्रा.गुंफा कोकाटे व सौ.संगिता फासाटे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. दु. ३ ते ४ या सत्रात प्रा.कळमकर आर.पी. व प्रा.खराडकर यु.एन. यांचे "राष्ट्रीय सेवा योजना आणि युवक" याविषयावर व्याख्यान झाले.

शिबिराच्या पाचव्या दिवशी सकाळी विद्यार्थ्यांचे एकूण ११ गट पाडण्यात आले. प्रत्येक गटाच्या प्रमुखारा गावातील कौटुंबिक माहिती मिळविण्याविषयी प्रश्नावली देण्यात आली प्रत्येक गटांकडून वाड्या वस्त्यांवरील गावाचा एकूण सर्वे घेण्यात आला व कुटुंबाकडून प्रश्नावली स्वरुपात माहिती गोळा करण्यात आली. या दिवशी दुपारच्या सत्रात प्रा.महेश कुलकर्णी यांनी ''काव्यातून पर्यावरण संवर्धन'' या विषयावर मार्गदर्शन केले. झाड आपले मित्र आहे त्याचे संवर्धन केले नाही तर या भूतलावरील मनुष्य प्राणी नष्ट होतील या दृष्टीकोनातून काव्यपंक्तीच्या आधारे वनसंर्वधनाचे महत्व विद्यार्थ्यांना पटवून दिले. मा.प्रसन्न धुमाळ, श्री.लक्ष्मीकांत कर्पे यांनी एच.आय.व्ही कशामुळे होतो त्यावर नियंत्रण व्हावे म्हणून कोणकोणत्या उपाययोजना. कराव्या याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले.

## शिबिरातील दिनचर्या

पहाटे पाच वाजता शिबिरार्थीच्या दिनचर्येस सुरवात होते. प्रथम सर्व शिबिरार्थींना २ कि.मी. चालण्याचा सराव दिला जातो मनशांती वा आरोग्य सदृढ राहण्यासाठी विविध व्यायाम प्रकार व योगाची प्रात्यक्षिके करुन घेतली जातात. व्यायामानंतर एन.एस.एस.गीत, पुणे विद्यापीठ गीत, खरा तो एकची धर्म, मंदिर ये हमारा, इतनी शक्ती हमे देना, बलसागर भारत होवो, हम होंगे कामयाब ही गीते नियमित घेण्यात आली सायंकाळी ५ ते ७ या वेळेत शिवार फेरीचे आयोजन करण्यात आले. दररोज रात्री स्वयंसेवकांच्या कलागुनांना वाव देण्यासाठी सांस्कृतीक कार्यक्रम आयोजित करण्यात आले.

## सांस्कृतीक कार्यक्रम

स्वयंसेवकांच्या कलांगुनांना वाव मिळावा म्हणून दररोज रात्री सांस्कृतीक कार्यक्रम आयोजित करण्यात आले. सांस्कृतीक कार्यक्रमामध्ये प्रत्येक सहभागी स्वयंसेवकाला संधि देण्यात आली. स्वयंसेवकांनी गाणी, पोवाडा, नकला, विनोद व काव्यवाचन सादर केले.

## विशेष सहकार्य

शिबिर यशस्वी करण्यासाठी ग्रामपंचायत वडाळा महादेव, विविध कार्यकारी सेवा सोसायटी, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, श्री.छत्रपती माध्यमिक विद्यालय, आखिल भारतीय मराठा महासंघ, जय बजरंग तरुण मंडळ, छावा युवा संघटना, शंभुराजे मित्रमंडळ, शिवगर्जना तरुण मित्र मंडळ, एकलव्य भिल्ल संघटना यांचे विशेष सहकार्य लाभले. शिबिर काळात ग्रामस्थांनी स्वयंसेवकासमवेत विविध उपक्रमामध्ये सहभाग घेतला.

## समारोप समारंभ

शिबिराचा समारोप समारंभ २ डिसेंबर २०१७ रोजी स. ९ वा. संपन्न झाला. सदर समारंभाच्या अध्यक्षस्थानी मा.सुमनभाई शाह, सदस्य, जनरल बॉडी, रयत शिक्षण संस्था सातारा हे होते. मा.अरुण जगताप साहेब उपविभागीय पोलिस अधिकारी श्रीरामपूर हे प्रमुख पाहुणे होते. मा.अॅड.विजयराव बनकर पाटील सदस्य जनरल बॉडी रयत शिक्षण संस्था सातारा मा.श्री.सुनिल कुदळे उपसरपंच, वडाळा महादेव व मा.श्री.उदयजी वाणी यांची प्रमुख उपस्थिती होती. तसेच समारोप समारंभासाठी ग्रामपंचायत सदस्य हनुमान राऊत, अर्चनाताई गायकवाड, उषाताई लांडे, मोहिनीताई जेठे, अप्पासाहेब वाघ, सचिन पवार, मा.धनंजय

पा.पवार चेअरमन वि.का.सह.सोसा. मा.मारुती खेमनार, व्हा.चेअरमन वि.का.सह.सोसा. मा.बाबासाहेब पवार माजी चेअरमन वि.का.सह.सोसा. मा.उत्तमराव पवार माजी चेअरमन वि.का.सह.सोसा. मा.सौ.सुलोचना पवार संचालक अशोक सह.साखर का.लि.अशोकनगर, मा.गुलाबराव पा.पवार माजी चेअरमन अशोक सह.साखर का.लि.अशोकनगर, मा.रघुनाथ पा.उघडे माजी चेअरमन वि.का.सह.सोसा. मा. प्रशांत दर्शने ग्रामविकास अधिकारी, मा.श्री.विनायक अंबेकर साहेब यांच्यासह बहुसंख्य ग्रामस्थ उपस्थित होते कार्यक्रमाचे प्रास्ताविक रा.से.यो. कार्यक्रम अधिकारी प्रा.सादिक सय्यद यांनी केले शिबिर काळात स्वयंसेवकांनी केलेल्या कामकाजाचा आढावा त्यांनी घेतला ग्रामस्थांच्यावतीने अध्यक्ष तंटामुक्ती समिती मा.धनंजय पा.पवार यांनी ग्रामस्वच्छता श्रमदान व वृक्षारोपन आणि गावाचे सर्वेक्षण याबदद्ल समाधान व्यक्त केले.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एल.डी.भोर यांनी श्रमसंस्कार व स्वावलंबन आणि रयत शिक्षण संस्था याबदद्ल विचार व्यक्त केले. प्रमुख पाहुणे मा.अरुण जगताप साहेब यांनी श्रम संस्कार शिबिराच्या माध्यमातून ग्रामीण भागात युवकांना एकत्रित काम करण्याची संधी मिळते. तरुण पिढी हे देशाचे भविष्य असून तरुण वर्गाने ग्रामीण भागाच्या विकासात महत्वाची भूमिका बजवावी व तरुणांनी गैरमार्गापासून दूर रहावे असे मत त्यांनी व्यक्त केले. ग्रामीण भागात स्वच्छता, अंधश्रध्द्, व्यसनाधिनता, स्त्रीयांना मिळणारी दुय्यम वागणुक व कायदेविषयक माहिती याबाबत प्रबोधन करण्याच्या गरजेवर भर दिला. कार्यक्रमाचे अध्यक्ष मा.सुमनभाई शहा यांनी शिबिरार्थी गावात केलेल्या स्वच्छतेच्या कामाचे गुणगौरव केले. सलग सहा वर्षे शिबिर आयोजनामुळे ग्रामस्थांना स्वच्छतेचे महत्व पटले आरोग्या बाबत जागरुकता निर्माण झाली. महिलांचा सहभाग वाढला याबदद्ल समाधान व्यक्त केले. शिबिरार्थींच्या वतीने रा.से.यो प्रतिनिधी श्री.भारत अचपळे, श्री.प्रविण गिरी, श्री.शुभम गाढवे तर विद्यार्थिनी स्वयंसेविकांच्या वतीने कु.सोनाली आसने, कु.प्रांजली लहारे, कु.काजोल कुऱ्हे यांनी मनोगत व्यक्त केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.कु.श्वेता दुग्गल यांनी केले. कार्यक्रमासाठी उपस्थित मान्यवर व ग्रामस्थांचे आभार प्रा.बापुसाहेब घोडके यांनी मानले.

विशेष श्रमसंस्कार शिबिराचे नियोजन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एल.डी.भोर यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. शिबिर कालावधित राबविल्या जाणाऱ्या विविध उपक्रमांचे यशस्वी नियोजन कार्यक्रमाधिकारी प्रा.सादिक सय्यद. प्रा.भाउसाहेब वाघमारे, प्रा.डॉ.सौ.पौर्णिमा गुजर यांनी केले. स्वयंसेवकांचा उत्स्फूर्त सहभाग आणि ग्रामस्थांच्या सहकार्यामुळे २६ नोव्हेंबर २०१७ ते ०२ डिसेंबर २०१७ या कालावधित मौजे वडाळा महादेव ता.श्रीरामपूर येथे विशेष श्रमसंस्कार शिबिर यशस्वीरित्या संपन्न झाले.

कार्यक्रम अधिकार
राष्ट्रिय सेवा योजना

प्राचार्य
सी.डी.जैन कॉलेज ऑफ कॉमर्स
श्रीरामपू

PRINCIPAL
C. D. Jain College of Commerce
Shrirampur

रयत शिक्षण संस्थेचे,

# सी.डी.जैन कॉलेज ऑफ कॉमर्स,

## श्रीरामपूर. जि.अहमदनगर.

## सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे.

## विद्यार्थी विकास मंडळ व विद्यार्थिनी मंच यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित

## "निर्भय कन्या अभियान शिबीर"

## अहवाल

**दि. ०५/१२/२०१७**

दिनांक ०५ डिसेंबर, २०१७ रोजी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे व सी.डी.जैन कॉलेज ऑफ कॉमर्स, श्रीरामपूर यांच्या संयुक्त विद्यमाने विद्यार्थी विकास मंडळ व विद्यार्थिनी मंच यांच्या समन्वयाने **"निर्भय कन्या अभियान शिबीर"** आयोजित करण्यात आले. विद्यापीठाच्या नियमांनुसार या अभियाना अंतर्गत ३ स्वतंत्र उपक्रमांचे आयोजन महाविद्यालयात करण्यात आले. या उपक्रमांमध्ये महाविद्यालयातील विद्यार्थिनींनी सहभाग नोंदविला या निर्भय कन्या अभियान शिबीराचे उद्घाटन मा.प्राचार्य डॉ.सौ.मंजुश्रीताई बोबडे, भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालय, औंद, पुणे, उद्घाटन समारंभासाठी अध्यक्षा म्हणून लाभलेल्या रयत शिक्षण संस्थेच्या मॅनेंजिंग कौन्सिल सदस्या व श्रीरामपूर रयत संकुलाच्या चेअरमन, मा.सौ.मीनाताई जगधने, महाविद्यालयाचे प्राचार्य मा.डॉ.भोर एल.डी. , उपप्राचार्य डॉ.बारहाते जी.एच. , विद्यार्थी विकास मंडळाचे कार्यक्रम अधिकारी डॉ.तुपे बी. जी., विद्यार्थीनी मंच समन्वयक डॉ.सौ.गुजर पी. एस. व सर्व सहकारी प्राध्यापक वृंद यांच्या उपस्थितीत संपन्न झाले. आदरणीय कर्मवीर आण्णा व कै.ती.स्व.लक्ष्मीबाईंच्या प्रतिमेचे पूजन करुन अभियान प्रारंभ करण्यात आले.

उद्घाटन समारंभाचे प्रास्ताविक व स्वागत महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.भोर एल. डी. यांनी केले. प्रास्तविक करतांना विद्यार्थिनींना तुम्ही निर्भय आहात का ? असे विचारुन निर्भय म्हणजे नेमक काय ? या निर्भय कन्या अभियान आयोजनाचे प्रयोजन नेमक काय ? त्यासाठी कोणत्या विशेष प्रयत्नांची गरज आहे या विविध विषयांवर विद्यार्थिनींना मार्गदर्शन केले.

## उद्घाटन समारंभ

**वेळ :- ०९:३० वाजता**

निर्भय कन्या अभियान शिबीरासाठी उद्घाटक म्हणून लाभलेल्या भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ.सौ.मंजुश्रीताई बोबडे यांनी आपल्या मनोगतामध्ये निर्भय कन्या अभियानाची उद्दीष्टे स्पष्ट करुन सांगितली. आयुष्यात यशस्वी होण्यासाठी निर्भय बनण्याची गरज असते हे त्यांनी स्पष्ट केले.

रयत शिक्षण संस्थेच्या मॅनेजिंग कौन्सिल सदस्या व श्रीरामपूर रयत संकुलाच्या चेअरमन, मा.सौ.मीनाताई जगधने यांनी आपले अध्यक्षीय मनोगत व्यक्त केले. आपल्या मनोगतात त्यांनी निर्भय कन्या अभियान सारखे उपक्रम घेण्याची वेळ का यावी ? अशी खंत व्यक्त केली. प्रत्येक विद्यार्थिनीने स्वत: सक्षम व निर्भय बनले पाहिजे. शालेय शिक्षणाबरोबरच समाजामध्ये येणा-या प्रत्येक संकटाचा सामना करण्याची ताकद आपण आपल्या अंगात रुजविली पाहिजे असे सखोल मार्गदर्शन केले.

या उद्‌घाटन समारंभात हिमोग्लोबिन तपासणी उपक्रम या पुस्तिकेचे प्रकाशन करण्यात आले. सन २०१६-१७ मधे महाविद्यालयातील ७७.१३ टक्के विद्यार्थिनींची हिमोग्लोबिन तपासणी करण्यात आली व त्यांच्याकडून संबंधित विषयाला धरुन प्रश्नावली भरुन घेऊन त्याचे विश्लेषण या पुस्तिकेमध्ये करण्यात आले आहे. उद्‌घाटन समारंभासाठी १४७ विद्यार्थिनी उपस्थित होत्या.

उद्‌घाटन समारंभाचे आभार विद्यार्थी विकास मंडळाचे कार्यक्रम अधिकारी प्रा.डॉ.तुपे बी.जी. यांनी मानले.

**-: प्रथम सत्र :-**

**दि. ०५/१२/२०१७ वेळ ११.३० ते १२.३०**

निर्भय कन्या अभियान शिबीराच्या उद्‌घाटन समारंभानंतर प्रथम उपक्रमामध्ये प्रमुख वक्त्या म्हणून भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालयाच्या प्राचार्या मा.डॉ.सौ.मंजुश्रीताई बोबडे यांनी **"मी निर्भया"** या विषयावर व्याख्यान दिले. मा. प्राचार्या. डॉ.सौ.मंजुश्रीताईंनी स्वत:च्या बालपणाच्या आठवणींना उजाळा दिला. कोणत्या कष्टातून अगदी निर्भय पणे खंबीरपणे परिस्थितीला तोंड देत आज त्या या यशाच्या शिखरावर पोहचल्या आहेत हे विद्यार्थिनींना उलगडून सांगितले. काहीतरी वेगळे करुन दाखविण्याची जिद्द,चिकाटी,व प्रामाणिकपणा जीवनात यशस्वी होण्यासाठी कारणीभूत ठरत असते. विद्यार्थीनींकडे **आत्मविश्वास,ईच्छाशक्ती,सकारात्मक विचार,क्रियाशीलता,महत्वकांक्षा** असावी म्हणजेच प्रत्येकीकडे **आईस्क्रीम** असावे असे अगदी सोप्या शब्दांत विद्यार्थिनींना पटवून दिले.

प्रत्येकीने आज समाजामध्ये वावरत असतांना, शिक्षण संपादन करत असतांना स्वत:मध्ये निर्भयता अंगिकारली पाहिजे, ती आज काळाची गरज बनलेली आहे. अशा विविध विषयांवर प्रकाशझोत टाकून त्यांनी विद्यार्थिनींना सखोल मार्गदर्शन केले.

प्रथम उपक्रमाच्या प्रमुख वक्त्यांचा परिचय व स्वागत विद्यार्थिनी मंच च्या समन्वयक प्रा.डॉ.सौ.गुजर पी. एस. यांनी केले. या उपक्रमाचे अध्यक्षस्थान स्विकारलेले महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.भोर एल.डी. यांनी आपले अध्यक्षीय मनोगत व्यक्त करतांना महाविद्यालयातील निर्भय कक्षा अंतर्गत चालविल्या जाणा-या विविध उपक्रमांना उजाळा दिला. या प्रथम उपक्रमाचे आभार प्रा.सौ.साळवे एस.के. यांनी मानले.

| | | |
|---|---|---|
| विद्यार्थिनी मंच समन्वयक | विद्यार्थी विकास मंडळ कार्यक्रम अधिकारी | प्राचार्य, सी.डी.जैन कॉलेज ऑफ कॉमर्स, श्रीरामपूर. |

रयत शिक्षण संस्थेचे,

## सी.डी.जैन कॉलेज ऑफ कॉमर्स,
## श्रीरामपूर. जि.अहमदनगर.

## सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ ,पुणे.
## विद्यार्थी विकास मंडळ व विद्यार्थिनी मंच यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित
## "निर्भय कन्या अभियान शिबीर"
## अहवाल

**दि . ०६/१२/२०१७**

**द्वितीय उपक्रम**

दिनांक ०६ डिसेंबर ,२०१७ रोजी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ,पुणे व सी.डी.जैन कॉलेज ऑफ कॉमर्स,श्रीरामपूर यांच्या संयुक्त विद्यमाने विद्यार्थी विकास मंडळ व विद्यार्थिनी मंच यांच्या समन्वयाने निर्भय कन्या अभियान शिबीराअंतर्गत द्वितीय उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. या द्वितीय उपक्रमासाठी प्रमुख वक्त्या म्हणून भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालय,औंद,पुणे येथील मा.सौ.मृणालीनी शेखर यांना निमंत्रित करण्यात आले. या उपक्रमामध्ये १७४ विद्यार्थिनींनी सहभाग नोंदविला. मा.प्रा.सौ.मृणालिनी शेखर यांना **"निर्भयतेला जोड हवी बौद्धिक अन् शारीरीक संपत्तीची"** हा विषय देण्यात आला. आजच्या प्रमुख वक्त्यांचे प्रास्ताविक व स्वागत मा.प्रा.सौ.जगताप एम.बी. यांनी केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.भोर एल.डी. हे होते मान्यवर अतिथिंचा सत्कार सोहळा संपन्न करुन व्याख्यानाला सुरुवात झाली .

विषयाला सुरुवात करत असतांना प्रा.सौ.मृणलिनी शेखर यांनी विद्यार्थिनींना बोलते केले. विद्यार्थिनींकडून नेमक निर्भयतेच्या संकल्पना यांच्या मनात काय काय आहेत हे त्यांनी जाणून घेतले निर्भयता म्हणजे फक्त ताकद नाही किंवा निर्भयता म्हणजे बुदधी नाही. तर निर्भयतेला परिपूर्ण करायचे असेल तर त्याला जोड असावी लागते बौदधीक आणि शारिरीक संपत्तीची. बऱ्याचदा शक्ती पेक्षा युक्ती श्रेष्ठ या युक्तीप्रमाणे बळाचा वापर न करता युक्तीने आलेल्या अडचणीवर मात करणे शक्य होऊ शकते. एखाद्याने अरे केले तर त्याला का रे ? असे विचारण्याची हिम्मत जर दाखविली तर समोरच्या माणसाचा आवाज कमी होईल, नजर खाली जाईल आणि पुढच्या संकटाला आळा घालता येईल. जर आपण घाबरत आहोत हे त्याच्या निदर्शनास आले तर मात्र त्याची हिम्मत बळावते आणि समाजात दुष्प्रकार घडतात. त्यामुळे प्रत्येकीने निर्भयतेबरोबरच बौद्धिक व शारिरीक संपत्तीचा देखील योग्य वेळी योग्य प्रकारे वापर करणे गरजेचे आहे.

प्रा.सौ.मृणालिनी शेखर बोलताना म्हणाल्या, सिंहावर बसलेली देवी ही सबल स्त्रीचे प्रतीक आहे. तर कमळावर बसलेली देवी ही सौंदर्य,प्रेम,माया व ममत्वाचे प्रतीक आहे. पुरणातील ही शक्तिस्थळे आहेत. या प्रतिकांचे फक्त पुजारी होण्यापेक्षा प्रत्येक विद्यार्थिनींने यांच्यातील आदर्श असे गुण हेरुन आत्मनिर्भर होण्यासाठी प्रयत्नशील असले पाहिजे. निर्भर बनण्यासाठी शरिर संपदा तसेच बौद्धिक संपदेची सुद्धा तितकीच आवश्यकता असते असे मत त्यांनी मांडले.

विद्यार्थिनींना त्यांच्या जीवनातील वेगवेगळया प्रसंगाचे दाखले देऊन सहज सोप्या भाषेमध्ये हा महत्वाचा गंभीर असा विषय समजावून सांगितला.

या निर्भय कन्या अभियान शिबीराच्या द्वितीय उपक्रमाचे अध्यक्षीय मनोगत प्राचार्य डॉ.भोर एल.डी. यांनी केले तर आभार प्रदर्शन प्रा.कु.श्वेता दुग्गल यांनी केले.

विद्यार्थिनी मंच
समन्वयक

विद्यार्थी विकास मंडळ
कार्यक्रम अधिकारी

प्राचार्य,
सी.डी.जैन कॉलेज ऑफ कॉमर्स,
श्रीरामपूर.

Chandraroop Dakala Jain College of Commerce
Shrirampur

PRINCIPAL
C. D. Jain College of Commerce
Shrirampur

रयत शिक्षण संस्थेचे,

# सी.डी.जैन कॉलेज ऑफ कॉमर्स,
# श्रीरामपूर. जि.अहमदनगर.

## सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ ,पुणे.
## विद्यार्थी विकास मंडळ व विद्यार्थिनी मंच यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित
## "निर्भय कन्या अभियान शिबीर"
## अहवाल

दि .०७/१२/२०१७

### तृतीय उपक्रम

दिनांक ०७ डिसेंबर,२०१७ रोजी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे व सी.डी.जैन कॉलेज ऑफ कॉमर्स,श्रीरामपूर यांच्या संयुक्त विद्यमाने विद्यार्थी विकास मंडळ व विद्यार्थिनी मंच यांच्या समन्वयाने निर्भय कन्या अभियान शिबीरा अंतर्गत तृतीय उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. या तृतीय उपक्रमासाठी प्रमुख वक्त्या म्हणून बाया कर्वे स्त्री अभ्यास केंद्र,पुणे येथील अध्यक्षा मा.सौ.विद्याताई कुलकर्णी यांना निमंत्रित करण्यात आले. या उपक्रमासाठी प्रमुख वक्त्यांना **"आरक्षण नको संरक्षण हवे"** हा विषय नियोजित केला होता. या उपक्रमामध्ये १४७ विद्यार्थिनींनी सहभाग नोंदविला.

उपक्रमाच्या प्रमुख वक्त्यांचे परिचय, स्वागत व प्रास्ताविक प्रा.सौ.खांडरे एस.आर. यांनी केले. या उपक्रमाचे अध्यक्षस्थान महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.भोर एल. डी. यांनी स्विकारले. मान्यवरांचा सत्कार सोहळा संपन्न करुन व्याख्यानाला सुरुवात झाली.

नियोजित विषयाला सुरुवात करण्यापूर्वी मा.सौ.विद्याताई कुलकर्णी यांनी त्यांच्या बाया कर्वे स्त्री अभ्यास केंद्राबद्दल विद्यार्थिनींना ओळख करुन दिली. थोर समाजसुधारक महर्षी कर्वे यांच्या द्वितीय पत्नी बाया कर्वे यांच्या नावाने स्त्री अभ्यास केंद्राची सुरुवात कशा प्रकारे झाली हे त्यांनी विद्यार्थिनींना सांगितले. पुरातन रुढी परंपरेमध्ये जखडलेल्या समाज व्यवस्थेला विरोध करुन स्त्री शिक्षणाची धुरा महर्षी कर्वे व त्यांच्या द्वितीय पत्नी बाया कर्वे यांनी कशा प्रकारे जोपासली या सर्व स्मृतींना त्यांनी उजाळा दिला.

आरक्षण नको संरक्षण हवे या विषयाला सुरुवात करतांना विद्याताई सध्या महिलांच्या आरक्षणावरुन समाजामध्ये जी वाच्यता होतांना दिसून येते त्याकडे लक्ष वेधले. ३३ टक्के वरुन महिलांचे आरक्षण ५० टक्क्यां पर्यंत नेण्याचे विचार पुढे येतांना दिसत आहेत हे त्यांनी सांगितले.

परंतु आज समाजामध्ये महिलांबाबत घडणाऱ्या विदारक घटनांचा त्यांनी आढावा घेतला. दिल्ली मध्ये घडलेले निर्भया प्रकरण, कोपर्डीमधील अल्पवयीन मुलीवर घडलेले बलात्कार व ,खूनाचे प्रकरण, अगदी ३-४ वर्षाच्या मुलींवर होणाऱ्या अत्याचाराच्या घटना ते ७०-८० वर्षाच्या वयोवृद्ध महिलांवर होणारे बलात्कार या सर्व विदारक घटनांचा आढावा जर घेतला तर खरी गरज कशाची वाटते ? आरक्षणाची की संरक्षणाची ? असा सवाल त्यांनी केला. याच बरोबर आता आरक्षण ही नको आणि संरक्षणही नको गरज आहे ती प्रत्येक स्त्री ने आत्मनिर्भर बनून आत्मसंरक्षण व स्वसंरक्षण करण्याची. अरे ला का रे ? असे उत्तर देण्यासाठी सक्षम बनण्याची आज काळाची गरज बनलेली आहे. असे मत त्यांनी मांडले.

या तृतीय उपक्रमाच्या अध्यक्षस्थानी असलेले महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.भोर एल.डी. यांनी अध्यक्षीय मनोगत व्यक्त केले व प्रा.सौ.श्वेता दुग्गल यांनी आभार मानले.

## समारोप कार्यक्रम

निर्भय कन्या अभियान शिबीराच्या समारोप समारंभात अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एल.डी.भोर महाविद्यालयाचे उपप्राचार्य, संशोधन विभाग प्रमुख डॉ.जी.एच. बारहाते व इतर सहकारी प्राध्यपक वृंद उपस्थित होते.

समारोप समारंभाचे प्रास्ताविक व स्वागत प्रा.सौ.साळवे एस.के.यांनी केले. तसेच ज्योती चौधरी व ऐश्वर्या थोरात या शिबीरार्थी विद्यार्थिनींनी आपले मनोगत व्यक्त केले. आपल्या मनोगतात त्यांनी ऐकलेल्या तीनही व्याख्यानांचा थोडक्यात आढावा घेतला व वक्त्यांचे आभार मानले. समारोप समारंभाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.भोर एल.डी. यांनी विद्यार्थिनींना महाविद्यालयाच्या विविध उप्रकमांमध्ये सहभागी होऊन आपले कौशल्य विकसित करण्याचे आवाहन केले. व प्रा.सौ.जगताप एम.बी.यांनी समारोप संमारंभाचे अभार व्यक्त केले.

| | | |
|---|---|---|
| विद्यार्थिनी मंच<br>समन्वयक | विद्यार्थी विकास मंडळ<br>कार्यक्रम अधिकारी | प्राचार्य,<br>सी.डी.जैन कॉलेज ऑफ कॉमर्स,<br>श्रीरामपूर. |

**Rayat Shikshan Sanstha's**

**C.D.Jain College of Commerce, Shrirampur**

**Student Welfare Board**

**Report On:Personality Development Programme for Girls – Studen**

**Date: 18/10/20**

C. D. Jain College of commerce, shrirampur in collaboration with Board of Student Self organized one jay workshop on "Personality Development Programme for Girls Students." The chi guest Dr. Preranatai shinde, the chairperson Dr. L.D. Bhor, Dr. Barhate, vice Principal-Dr. Adik a the Dignitaries 'inaugurated the function. The principal welcomed all Miss Pournima Gujar introduc the workshop and it's objectives.

In the first session, the speaker Dr. Preranatai shinde expressed her views on 'Girls' Hea Problems'. For this guidance, Prof. Priyanka Rathod expressed vote of thanks.

The second speaker in the second session, Prof. Dr. Ujjwala Bhor expressed her views 'Language' it's style and Importance'. Communication skill is the most important in day to jay li The said after the lunch ti8me, Prof Pournima Gujar expressed her views on job opportunities students (Girls). Miss Kala Pooja expressed her gratitude for this guidance.

In valedictory session, Miss Shaikh and other girls students expressed their views importance of such workshop. Principal Dr. L.D. Bhor reminded all about famous personalities Indian. History Prof. Priya Taralkar expressed vote of thanks to all 150 and ware students (girls) we present activity for this workshop.

| | | |
|---|---|---|
| **Coordinator**<br>**Students' Welfare Board** | **Chairman**<br>**Widyarthini Munch** | **Principal**<br>**C. D. Jain College of Commerce, Shrirampur** |

रयत शिक्षण संस्थेचे,

# सी.डी.जैन कॉलेज ऑफ कॉमर्स, श्रीरामपूर. जि.अहमदनगर.

## सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे व विद्यार्थी विकास मंडळ

**यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित**

## "कन्या रत्न वाचवा अभियान शिबीर"

## अहवाल

दि. १४ डिसेंबर, २०१७

दिनांक १४ डिसेंबर, २०१७ रोजी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ व सी.डी.जैन कॉलेज ऑफ कॉमर्स, श्रीरामपूर यांच्या संयुक्त विद्यमाने विद्यार्थी विकास मंडळ व विद्यार्थिनी मंच यांच्या समन्वयाने "कन्या रत्न वाचवा अभियान" आयोजित करण्यात आले. या शिबीरासाठी एकूण २१५ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला. या शिबीराचे उद्घाटन मा.सौ.मीनाताई जगधने (मॅनेजिंग कौंन्सिल सदस्या, रयत शिक्षण संस्था सातारा व चेअरमन, रयत शैक्षणिक संकुल, श्रीरामपूर) व महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एल.डी.भोर, उपप्राचार्य डॉ.जी.एच.बारहाते, विद्यार्थिनी मंच समन्वयक प्रा.सौ.गुजर पी.एस. तसेच विद्यार्थी विकास मंडळाचे कार्यक्रम अधिकारी डॉ.तुपे बी.जी यांनी कर्मवीर अण्णा व कै.ती.सौ.लक्ष्मीबाई यांच्या प्रतिमेचे पूजन करुन केले. प्रा.डॉ.सौ.गुजर पी.एस. यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक करतांना कन्या रत्न वाचवा अभियानाचे उद्दिष्ट स्पष्ट केले.

### उद्घाटन समारंभ

### वेळ :- सकाळी ९.३० वाजता

"कन्या रत्न वाचवा अभियान" शिबिरासाठी उपस्थित महाविद्यालयाचे मा.प्राचार्य डॉ.एल.डी.भोर यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधतांना आजचा विद्यार्थी उद्याचा सूज्ञ नागरीक असल्याने विद्यार्थ्यांच्या खांद्यावर असणा-या जबाबदारीची जाणीव विद्यार्थी व विद्यार्थिनींना करुन दिली.

या शिबीरासाठी उद्घाटक व अध्यक्षा म्हणून लाभलेल्या रयत शिक्षण संस्थेच्या मॅनेजिंग कौन्सिल सदस्या व श्रीरामपूर रयत संकुलाच्या चेअरमन मा.सौ.मीनाताई जगधने यांनी स्वत:च्या बालपणीच्या स्मृतींना उजाळा दिला. स्वातंत्र्यपूर्व काळातील त्यांचे बालपण असून देखील त्यांच्या आई - वडिलांनी बालपणापासूनच मुलगा किंवा मुलगी असा भेदभाव न करता त्यांचे संगोपन केल्यामुळे आज त्या खंबीरपणे मार्गक्रमण करत आहेत असे त्यांनी विद्यार्थ्यांना सांगितले उद्घाटन समारंभाचे आभार विद्यार्थी विकास मंडळाचे कार्यक्रम अधिकारी डॉ.तुपे बी.जी. यांनी मानले.

## प्रथम सत्र

## वेळ :- ११.३० ते १२.३०

"कन्या रत्न वाचवा अभियान" शिबीराच्या प्रथम सत्रामध्ये प्रमुख वक्त्या म्हणून श्री.श्री.रविशंकर विद्यामंदिर, वडाळा महादेव येथील व्यवस्थापिका मा.सौ.अर्चनाताई भंडारी या उपस्थित होत्या. त्यांनी आपल्या व्याख्यानात "लेक वाचवा देश वाचवा" या विषयावर विद्यार्थ्यांशी संवाद साधला. व्याख्यानाला सुरुवात करतांनाच त्यांनी देवीच्या उपासनेचा मंत्र म्हणून दाखविला -

"या देव सर्व भुतेषू , शक्ती रुपेषू संस्थिता
नमस्तस्यै नमस्तस्यै नमस्तस्यै नमो नम:"

हिंदू संस्कृती मध्ये कायम देवीच्या उपासनेला अनन्य साधारण महत्व दिले गेले आहे असे देखील त्या म्हणाल्या. कोणत्याही विषयात महत्वाची खाती म्हणजे संरक्षण - ज्या साठी दुर्गा देवीची उपसना, अर्थ खाते - ज्यासाठी लक्ष्मी देवीची उपासना तसेच शिक्षण खाते - ज्यासाठी सरस्वती देवीची उपासना केली जाते. आपण देवीची उपासना अगदी पुरातन काळापासून करतो आहोत पण तिची जोपासना केली जातेय का ? आज तांत्रिक प्रगतीमुळे माणूस चंद्रावर जाऊन पोहोचला आहे. अवकाशात भरारी घेत आहे. प्रगतीच्या सर्वोच्च शिखरांवर पोहचत आहे परंतु याच तांत्रिक प्रगतीने माणसाला काही माध्यमांमधून अगदी रसातळाला पोहचविले आहे याची जाणीव वेगवेगळया उदाहरणांमधून त्यांनी विद्यार्थ्यांना पटवून दिली. सोनोग्राफीच्या तंत्रज्ञानाचा सुयोग्य वापर करण्याचे सोडून आईच्या पोटातील गर्भ मुलाचा आहे की मुलीचा हे बघण्यासाठी केला जात आहे आणि या जगात जन्म घेण्याआधीच मुलीचा गर्भ मारुन टाकला जात आहे. हे निर्घुण सत्य त्यांनी विद्यार्थ्यांसमोरं मांडले. स्त्री - पुरुषांचे प्रमाण कमी - जास्त झाल्याने समाजामध्ये उभ्या राहणा-या नवनवीन संकटाचे भीषण सत्य त्यांनी सांगितले व लेक वाचली तर देश वाचेल असे विद्यार्थ्यांना समजावून सांगितले.

या प्रथम सत्राचे प्रास्ताविक व स्वागत प्रा.सौ.जगताप एम.बी. यांनी केले तर आभार प्रदर्शन प्रा.सौ.खांडरे एस.आर यांनी मानले.

## द्वितीय सत्र

## वेळ :- दु.१२.३० ते १.३०

"कन्या रत्न वाचवा अभियान" शिबीराच्या दुस-या सत्रामध्ये कार्यक्रमाचे प्रास्ताविक व स्वागत प्रा.सौ.खांडरे एस.आर. यांनी केले. द्वितीय सत्राच्या वक्त्या मा.सौ.शुभांगीताई कोरडे यांनी "आजची मुलगी - उद्याचे भविष्य" या विषयावर विद्यार्थ्यांशी संवाद साधला.

आपल्या जीवनात आई हा पहिला गुरु आणि नंतर शिक्षक हा आपला गुरु आणि नंतर शिक्षक हा आपला गुरु असतो. असे त्यांनी विद्यार्थ्यांना सांगितले. समाजातील यशस्वी स्त्रीयांच्या संघर्षाची उदाहरणे त्यांनी विद्यार्थ्यांसमोर मांडली. आज मुलगी कोणत्याही क्षेत्रात मागे नाही तरीदेखील तीला दुय्यम स्थान

दिले जाते याची खंत त्यांनी आपल्या मनोगता मध्ये व्यक्त केली. "प्रत्येक कळीला हक्क आहे जगण्याचा" असा आर्त संदेश त्यांनी विद्यार्थ्यांनाा दिला. व्याख्यानाचा शेवट करतांना त्यांनी पुढील पंक्ती सांगितल्या -

"ती जराशी उंचावताना, नभही जरासे वाकले,
मागू नका हो कोणी तिच्या या उंच भरारीचे दाखले"

द्वितीय सत्राच्या कार्यक्रमाचे आभार प्रा.सौ.साळवे एस.के. यांनी केले.

**भोजन वेळ १.३० ते २.३० वाजता.**

कन्या रत्न वाचवा अभियानासाठी उपस्थित विद्यार्थीनींना स्नेह भोजन देण्यात आले.

## तृतीय सत्र
## वेळ दु. २.३० ते ३.३०

तृतीय सत्रात प्रमुख वक्त्या मा.सौ.प्रतिभाताई ठुबे यांनी "पणती असावी घरोघरी" या विषयावर व्याख्यान दिले. प्रमुख वक्त्यांचा परिचय प्रा.डॉ.सौ.गुजर पी.एस. यांनी करुन दिला. मनोगत व्यक्त करतांना प्रतिभाताईंनी आपल्या समाजातिल काही चुकीच्या धोरणांचे दाखले विद्यार्थ्यांसमोर मांडले. म्हातारपणाची काठी मुलगाच होऊ शकतो हा एक विचार त्यांनी खोडून काढला. एक मुलगाच का ? मुलगी नाही का आपल्या आई वडिलांना वृद्धापकाळात आधार देऊ शकत त्याच बरोबर त्यांनी मुलींना देखील स्वत:च्या कर्तृत्वाची जाणीव करुन देतांना प्रत्येक मुलीने सुनेच्या रुपात गेल्यावर जर मुलीचीच भूमिका पार पाडली तर हे प्रश्नच उद्भवणार नाहीत असे देखील सांगितले. मनोगताच्या शेवटी त्यांनी पुढील ओळी सादर केल्या - "कन्यादानासारखे नाही रे पुण्य ... अन कन्या हत्ये सारखे नाही रे दुसरे पाप".
या सत्राचे आभार प्रा.कु. श्वेता दुग्गल यांनी मानले.

## समारोप कार्यक्रम
## वेळ :- ३.३० ते ४.३०

"कन्या रत्न वाचवा अभियान" शिबिराच्या समारोप कार्यक्रमाचे प्रास्ताविक विद्यार्थिनी मंच समन्वयक प्रा.डॉ.सौ.गुजर पी.एस. यांनी केले. पुजा शिरसाठ व सोनाली आसने या विद्यार्थिनींनी आपले मनोगत व्यक्त करतांना शिबिरामध्ये ऐकलेल्या व्याख्यानांचा आढावा घेतला व विद्यार्थिनींच्या वतीने समाजामध्ये बदल घडविण्याचे वचन त्यांनी दिले. समारोह समारंभाच्या अध्यक्ष स्थानावरुन महाविद्यालयाचे मा.प्राचार्य.डॉ.एल.डी. भोर सर यांनी आपले अध्यक्षीय मनोगत व्यक्त केले . प्रा.सौ.जगताप एम.बी. यांनी कार्यक्रमाचे आभार मानले.

| | | |
|---|---|---|
| विद्यार्थिनी मंच समन्वयक | विद्यार्थी विकास मंडळ कार्यक्रम अधिकारी | प्राचार्य सी.डी.जैन कॉलेज ऑफ कॉमर्स, श्रीरामपूर. |

PRINCIPAL
C. D. Jain College of Commerce
Shrirampur

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, विद्यार्थी विकास मंडळ अंतर्गत

स्वावलंबी शिक्षण हेच आमचे ब्रीद - " कर्मवीर "

रयत शिक्षण संस्थेचे,





# चंद्ररुप डाकले जैन कॉलेज ऑफ कॉमर्स, श्रीरामपूर,
## जि. अहमदनगर - ४१३७०९

नॅक मानांकित "ए" ग्रेड

आय.एस.ओ. ९००१-२००८ मानांकित महाविद्यालय

## विद्यार्थी विकास मंडळ व विद्यार्थिनी मंच
## यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित

# "आपत्ती व्यवस्थापन शिबीर"

## कार्यक्रम पत्रिका

शुक्रवार, १५ डिसेंबर,२०१७. वेळ :सकाळी ०९.३०. वाजता

| | | |
|---|---|---|
| प्रास्ताविक व स्वागत | : | प्रा.डॉ.तुपे बी.जी.<br>(विद्यार्थी विकास मंडळ, कार्यक्रम अधिकारी) |
| उद्घाटक व अध्यक्षा | : | मा.सौ.मीनाताई जगधने<br>(सदस्या, मॅनेजिंग कौन्सिल, रयत शिक्षण संस्था, सातारा.<br>चेअरमन, रयत शैक्षणिक संकुल, श्रीरामपूर ) |
| प्रमुख पाहुणे | : | मा.श्री.तेजस चव्हाण साहेब<br>(प्रांत अधिकारी,श्रीरामपूर.) |
| प्रमुख उपस्थिती | : | मा.प्राचार्य डॉ.लक्ष्मणराव भोर<br>(सी.डी.जैन कॉलेज ऑफ कॉमर्स, श्रीरामपूर ) |
| आभार | : | प्रा.खराडकर यु.एन. |
| सूत्र संचालन | : | प्रा. डॉ. सौ. पौर्णिमा गुजर<br>(विद्यार्थिनी मंच, समन्वयक ) |

PRINCIPAL
C. D. Jain College of Commerce
Shrirampur

रयत शिक्षण संस्थेचे,

**सी.डी.जैन कॉलेज ऑफ कॉमर्स,**

**श्रीरामपूर. जि.अहमदनगर.**

**सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ ,पुणे व**

**विद्यार्थी विकास मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित**

**" आपत्ती व्यवस्थापन शिबीर"**

**अहवाल**

**दि . १५/१२/२०१७ ते**
**दि. १६/१२/२०१७**

दि . १५ डिसेंबर व १६ डिसेंबर रोजी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ,पुणे व सी.डी.जैन कॉलेज ऑफ कॉमर्स,श्रीरामपूर यांच्या संयुक्त विद्यमाने विद्यार्थी विकास मंडळ व विद्यार्थिनी मंच यांच्या समन्वयाने दोन दिवसीय आपत्ती व्यवस्थापन शिबीराचे आयोजन करण्यात आले या शिबिरासाठी १४० विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला.

१५ डिसेंबर २०१७ रोजी ९.३० ते १०.३० वाजता शिबिरार्थी व उपस्थिती मान्यवरांना चहा व नाष्ट्याचे आयोजन करण्यात आले.

**उद्‌घाटन समारंभ**

**१५ डिसेंबर २०१७, वेळ १०.३०**

आपत्ती व्यवस्थापन शिबिराच्या उद्‌घाटन समारंभासाठी अध्यक्षा म्हणून रयत शिक्षण संस्थेच्या मॅनेजिंग कौन्सिल सदस्या व श्रीरामपूर रयत शैक्षणिक संकुलाच्या चेअरमन मा.सौ.मीनाताई जगधने, प्रमुख पाहुणे म्हणून श्रीरामपूर तालुक्याचे प्रांत अधिकारी मा.श्री.तेजस चव्हाण साहेब, महाविद्यालयाचे मा.प्राचार्य.डॉ.एल.डी.भोर, विद्यार्थी विकास मंडळाचे कार्यक्रम अधिकारी डॉ.तुपे बी.जी. यांच्या उपस्थितीत संपन्न झाला. सर्व उपस्थित मान्यवरांनी कर्मवीर अण्णा, कै.ती.सौ.लक्ष्मीबाईंच्या प्रतिमेचे पूजन करुन कार्यक्रमास सुरुवात केली.

विद्यार्थी विकास मंडळाचे कार्यक्रम अधिकारी डॉ.तुपे बी.जी. यांनी कार्यक्रमाचे प्रास्तविक करतांना आपत्ती व्यवस्थापन म्हणजे नेमकं काय ? या अभियान आयोजना मागची विद्यापीठाची, महाविद्यालयाची भूमिका विद्यार्थ्यांना समजावून सांगितली, आपत्तीचे वेगवेगळे प्रकार , त्यावर राखण्याचे प्रसंगावधान याची विद्यार्थ्यांना जाणीव करुन दिली. उपस्थित मान्यवरांची ओळख व स्वागत करुन पुढील कार्यक्रमास सुरुवात झाली.

आपत्ती व्यवस्थापन शिबिरासाठी प्रमुख पाहुणे म्हणून लाभलेले श्रीरामपूर तालुक्याचे प्रांतअधिकारी मा.श्री.तेजस चव्हाण साहेबांनी विद्यार्थ्यांशी मनमोकळा संवाद साधला. आपत्ती व्यवस्थापनामधील तीन टप्पे

त्यांनी सांगितले - आपत्तीपूर्व, आपत्ती दरम्यान व आपत्ती नंतर करण्यात येणारे व्यवस्थापनामधील फरक आणि त्याची गरज त्यांनी विद्यार्थ्यांना सांगितली. आपत्तीची वेगवेगळी उदाहरणे देऊन त्या परिस्थितीमध्ये प्रशासन कशा प्रद्धतीने कार्यवाही करत असते हे सांगत असतानाच एका जबाबदार नागरीक म्हणून समाजातील प्रत्येक घटकाची जबाबदारी काय असते हे देखील त्यांनी सांगितले.

महाविद्यालयाचे मा.प्राचार्य डॉ.भोर सरांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधला. उद्‌घाटन समारंभाच्या अध्यक्षस्थानी असलेल्या मा.सौ.मीनाताई जगधने, रयत शिक्षण संस्थेच्या मॅनेजिंग कौन्सिल सदस्या व श्रीरामपूर रयत शैक्षणिक संकुलाच्या चेअरमन यांनी अध्यक्षीय मनोगत व्यक्त करताना खिलारी चा भूकंप, त्सुनामी तसेच नुकतेच येऊन गेलेले ओखी वादळ असे वेगवेगळे प्रसंग सांगून विद्यार्थ्यांना जागरुक राहण्याची व समचसूचक राहण्याचे मार्गदर्शन केले.

उद्‌घाटन समारंभाचे आभार प्रदर्शन प्रा.खराडकर यू.एन. यांनी मानले.

## प्रथम सत्र

## वेळ - ११.३० ते १.००

आपत्ती व्यवस्थापन शिबिराच्या उद्‌घाटनानंतर प्रथम सत्रामधे प्रमुख वक्ते म्हणून श्री. अमोल अशोक जोशी, भारत गॅस कंपनी, श्रीरामपूर यांनी **"घरगुती गॅस वापर करतांना निर्माण होणा-या आपत्तींचे प्रतिबंध आणि नियंत्रण"** या विषयावर व्याख्यान दिले व प्रात्यक्षिके दाखविली. आज घरांमध्ये एल.पी.जी. गॅस सिलेंडर वापरले जाताना परंतु बऱ्याचदा शुल्लक निष्काळजीपणा मुळे अपघात झालेले दिसून येतात.

घरगुती गॅस वापरतांना कोणकोणत्या खबरदा-या घेणे गरजेचे आहे. हे त्यांनी विद्यार्थ्यांसमोर काही प्रात्यक्षिके दाखवून समजावून सांगितली. विद्यार्थ्यांबरोबर प्रश्न उत्तरांमधून त्यांनी संवाद साधला. सर्वप्रथम अपघात होणारच नाही यासाठी घ्यावयाची काळजी असतेच, तसेच अपघात झाल्यास त्यावर नियंत्रणात्मक प्राथमिक उपचार त्यांनी विद्यार्थ्यांना सांगितले.

प्रथम सत्राचे प्रास्तविक व स्वागत प्रा.कुलकर्णी एस.व्ही. यांनी केले तर आभार प्रदर्शन प्रा.सौ.खांडरे एस.आर. यांनी केले.

## भोजन

## वेळ - १.०० ते २.३०

शिबिरार्थी विद्यार्थ्यांनी नियोजित भोजनाचा आस्वाद घेतला.

## द्वितीय सत्र
## वेळ - २.३० ते ३.३०

आपत्ती व्यवस्थापन शिबिराच्या प्रथम दिवसाच्या द्वितीय सत्रासाठी मा.प्रा.ससाणे एस.बी. हे प्रमुख वक्ते म्हणून उपस्थित होते. त्यांच्या व्याख्यानाचा विषय **"ओखी वादळ आणि नैसर्गिक व्यवस्थापन"** असा होता. या सत्राचे प्रास्ताविक व स्वागत प्रा.खराडकर यु.एन. यांनी केले. व्याख्यानास सुरुवात करताना प्रा.ससाणे यांनी आजपर्यंत भारत देशामध्ये झालेल्या वादळांचा आढावा घेतला व विद्यार्थ्यांना या नैसर्गिक आपत्तींची कारणे समजावून सांगितली. निसर्गावर मनुष्याने केलेले आक्रमण हे या प्रकारच्या नैसर्गिक आपत्तींचे मूळ कारण असते, असे देखील त्यांनी नमूद केले.

नुकत्याच झालेल्या ओखी वादळाची कारण मिमांसा सांगून त्यासाठी सरकारने केलेल्या व्यवस्थापनाचा आढावा त्यांनी घेतला. एक सामाजिक घटक म्हणून प्रसंगी हजर असलेल्या नागरीकांची कर्तव्ये देखील त्यांनी विद्यार्थ्यांना विस्तृतपणे सांगितली. नैसर्गिक आपत्ती जरि माणसाच्या हातात नसल्या तरि देखील आपल्याकडून निसर्गाची हानी तर होत नाही ना याकडे लक्ष देणे हे भावी पिढीचे आद्य कर्तव्य बनलेले आहे असे त्यांनी सांगितले.

या सत्राचे आभार प्रदर्शन प्रा.सौ.जगताप एम.बी. यांनी केले.

**दि. १६/१२/२०१७**

## आपत्ती व्यवस्थापन शिबीर
## द्वितीय दिन - अहवाल

१६ डिसेंबर, २०१७ रोजी ९.३० ते १०.३० वाजाता शिबिरार्थी विद्यार्थी तसेच उपस्थित मान्यवरांनी नियोजित चहा व नाष्टयाचा आस्वाद घेतला.

## तृतीय सत्र
## वेळ - १०.३० ते ११.३०

आपत्ती व्यवस्थापन शिबिराच्या तृतीय सत्रासाठी प्रमुख वक्ते म्हणून मा.श्री.सुनील देशमुख यांनी **"आग नियंत्रण आणि प्रतिबंध"** या विषयावर व्याख्यान देण्यासाठी निमंत्रीत करण्यात आले होते. या सत्राचे प्रास्ताविक व स्वागत विद्यार्थी विकास मंडळाचे कार्यक्रम अधिकारी डॉ.तुपे बी.जी. यांनी केले.

आपल्या व्याख्यानामध्ये श्री. देशमुख यांनी सुरवातीला विद्यार्थ्यांना बोलते केले. आगीपासून येणा-या वेगवेगळया आपत्तींचे अनुभव विद्यार्थ्यांकडून ऐकून घेतले तसेच या आपत्ती घडण्यामागे असणारी कारणे विद्यार्थ्यांना समजावून सांगितली. आगीपासून निर्माण होणा-या आपत्ती टाळण्यासाठी कोणत्या उपयायोजना करणे गरजेचे आहे हे त्यांनी सांगितले व तसेच आपत्ती घडल्यानंतर प्राथमिक उपचार कसे असावेत त्यावेळी

कोणती खबरदारी घेतली जावी हे देखील विद्यार्थ्यांना सोप्या शब्दात सांगितले. आग प्रतिबंध यंत्रणा वापर करण्याबाबतीत प्रश्नांची समाधानकारक उत्तरे दिली.

या सत्राचे आभार प्रदर्शन प्रा.कुलकर्णी एस.व्ही. यांनी केले.

**चौथे सत्र**

**वेळ - ११.३० ते १२.३०**

आपत्ती व्यवस्थापनाच्या चौथ्या सत्रासाठी प्रमुख वक्ते म्हणून श्री.रोहित बखरे यांनी **"सर्पदंश झाल्यानंतर उपाययोजना व प्रतिबंध"** या विषयावर विद्यार्थ्यांना व्याख्यान दिले. व्याख्यानास सुरुवात करतानाच त्यांनी भारतात आढळणाऱ्या एकूण सापांपैकी अगदी कमी प्रमाणातील साप विषारी असतात हे विद्यार्थ्यांना सांगितले. सर्पदंशामुळे होणारे मृत्यू हे बऱ्याचदा विषबाधेमुळे न होता, भिती, गैरसमज व चुकीच्या उपचारांमुळे संभवतात हे विद्यार्थ्यांना समजावून सांगितले. प्रेझेंन्टेशनच्या माध्यमातून भारत देशात आढळणाऱ्या विविध सर्पजातींची ओळख त्यांनी करुन दिली तसेच सर्पदंश झाल्यानंतर करण्यात येणा-या उपाय योजना व प्रतिबंध यावर सखोल मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांच्या मनातील काही गैरसमज देखील या व्याख्यानाच्या माध्यमातून दूर झाले.

